सामना उत्सव रविवार पुरवणी
गुरुजी
शोध
आपली प्रतिक्रिया कळवा

# समर्थ



**अनुग्रहाच्या मंत्रापासूनच अद्वैताची आणि प्रयत्नांची धगधगीत शिकवण देणाऱ्या या राष्ट्रपुरुषाची जयंती आज, म्हणजेच माघ कृष्ण नवमी या दिवशी साजरी होते. किंबहुना या महापुरुषाच्या स्मरणार्थ या तिथीलाच दासनवमी, असे नामाभिधान देण्यात आले आहे.**

समर्थ ही पदवी संत रामदासांच्या नावापुढे कशी जोडली गेली असेल याची उकल अत्यंत उद्बोधक आहे. समर्थांचं घोषवाक्य म्हणजे जय जय रघुवीर समर्थ ! या त्यांच्या आवेशपूर्ण घोषवाक्यात अनेक सूक्ष्मार्थ दडले आहेत, ते असे, 'मी त्या रघुवीराचं दास्यत्व करतो आणि त्याचा जयजयकार करतो. तो माझा रघुवीर विश्वातल्या सर्व गोष्टी घडवून आणायला समर्थ आहे. किंबहुना मी करत असलेल्या सत्कर्माच्या कार्याला प्रत्यक्ष प्रभू रामचंद्रांचं अधिष्ठान लाभल्यामुळे, त्या रामाचा दास असलेला मीसुद्धा ते कार्य घडवून आणायला समर्थ आहे!' अतिशय विपरीत अशा त्या काळात परकीय सत्तेच्या अमलाखाली असलेल्या आणि आत्मविश्वास हरपलेल्या समाजाला संघटित करणं, लोकांमध्ये स्वाभिमानाचा वन्ही चेतवणं आणि संपन्न अशा राष्ट्राची निर्मिती करण्यासाठी शिष्य घडवणं, हे अत्यंत अवघड असलेलं कार्य करण्याचं सामर्थ्य त्यांच्याकडे होतं, म्हणून ते समर्थ! समर्थ या पदवीची व्याख्या श्रीमद् दासबोधात त्यांनीच स्पष्ट केली आहे.

बहुत जनास चालवी! नाना मंडळे हालवी!!
ऐसी हे समर्थ पदवी! विवेके होते!! (दासबोध १८.१०.४६)

'स्वत: विवेकपूर्ण जीवन जगत कितीतरी लोकांना सत्कर्माच्या कार्याला लावलं, कितीतरी मंडळं, साम्राज्यं हलवली आणि मग मी समर्थ ही पदवी प्राप्त केली,' हेच त्यांनी या ओवीत जणू सुचविलं आहे. असं चळवळीचं सामर्थ्य निर्माण करण्याचं प्रचंड कार्य काही एका दिवसात घडलं नाही. त्या मागे समर्थांनी आयुष्यभर केलेली जाज्वल्य साधना होती. या साधनेची सुरुवात अगदी लहानपणी म्हणजे वयाच्या बाराव्या वर्षी गायत्री मंत्राच्या कठोर पुरश्चरणाने त्यांनी केली. अशी साधना सतत बारा वर्षे केल्यानंतर जवळ जवळ एक तप त्यांनी भारतभर देशभ्रमण केले. त्या काळात त्यांनी समाजाचं उत्तम निरीक्षण केलं. समाजात काय त्रुटी आहेत, कुठल्या गोष्टीचा अभाव आहे याचा बारकाईने अभ्यास केला आणि त्यानंतर समाजधारणेच्या, धर्मसंस्थापनेच्या कार्याला सुरुवात केली. त्या काळी प्रचलित अंधश्रद्धांवर अतिशय परखडपणे कोरडे ओढून 'वन्ही तो चेतवावा रे, चेतविताची चेततो' या आपल्याच उक्तीचे शब्दश: अनुसरण करून समाज प्रबोधनाचे कार्य त्यांनी दासबोधाद्वारे केले.

समर्थ रामदास स्वामी, स्वराज्य स्थापनेसाठी जेवढे ठाम होते तेवढेच ठाम ते ईश्वरप्राप्तीसाठी होते. आपल्या सबंध जीवनाचं सार त्यांनी एकाच ओवीत सांगितलं आहे.

मुख्य हरिकथा निरूपण! दुसरे ते राजकारण!!
तिसरे ते सावधपण! सर्वविषंई!! (दासबोध ११.५.४)

समर्थांच्या संपूर्ण जीवनचरित्राचं अवलोकन केलं तर त्यांनी प्रथम प्राधान्य दिलं ते हरिकथा निरूपणाला. म्हणजे अध्यात्माच्या प्रसार आणि प्रचाराला. दुसरे प्राधान्य दिलं ते राजकारणाला. आजच्या परिभाषेतला पक्षीय राजकारणाचा अर्थ इथे अपेक्षित नाही. तर सत्कर्म करण्यासाठी साधकाने व्यवहारचातुर्य, सावधपणा, अष्टावधानीपणा, बलोपासना या आवश्यक असलेल्या गुणांची वृद्धी करून त्याचा अवलंब करणे, याला त्यांनी राजकारण म्हटले आहे. यासाठी, जागोजागी त्यांनी निर्माण केलेल्या हनुमान मंदिर आणि मठांची व्यवस्था बघणाऱ्या महंतांकरिता दासबोधात 'महंत लक्षण' नावाचा स्वतंत्र समासच त्यांनी रचला.

समर्थांच्या कार्यामध्ये प्रामुख्याने उल्लेख करावा लागतो तो त्यांनी निर्माण केलेल्या विपुल ग्रंथसंपदेचा. श्रीमद् दासबोध, आत्माराम, मनाचे श्लोक, यासह उदंड अशा समर्थ वाङ्मयात नुसतं तत्त्वज्ञान नाही तर आचरणात आणण्यासारखी शिकवण ठासून भरली आहे. मनाच्या श्लोकांमध्ये आढळणारं समाजाचं निरीक्षण आणि मनाचं विश्लेषण आजच्या समाजशास्त्रज्ञांना आणि मानसोपचार तज्ज्ञांनाही आदर्शवत ठरावं असंच आहे. मनाच्या श्लोकातला कुठलाही एक श्लोक घेतला तर संपूर्ण मानवी जीवनाचं सार त्यात आढळेल. दु:ख या मानवी भावनेची समर्थांनी ज्या पद्धतीने सोपी आणि सुटसुटीत व्याख्या केली आहे त्याला तोड नाही, ती म्हणजे न होता मनासारिखे दु:ख मोठे!' म्हणजेच मनासारखे झाले नाही की जी भावना बळावते त्याला दु:ख म्हणतात.

प्रापंची सामान्य मनुष्याला परमार्थ करताना कायम लक्षात ठेवण्यासारखा एक अतिशय सोपा असा समर्थांचा श्लोक आहे.

उपासनेला दृढ चालवावे! भूदेव संतांशी सदा नमावे!!
सत्कर्म योगे वय घालवावे! सर्वा मुखी मंगल बोलवावे!!

या चार वाक्यांप्रमाणे जो आयुष्यभर सत्कर्माच्या उपासनेचा संकल्पपूर्वक अवलंब करेल, समस्त सत्पुरुषांसमोर अहंकाररहित असा नम्र राहील आणि लोकांकडूनही चांगली साधना, चांगले सत्कर्म करून घेईल, त्याला याची देही याची डोळा ब्रह्मप्राप्ती झाल्याशिवाय राहणार नाही, हे प्रत्यक्ष समर्थांचं आश्वासन आहे!

- बापट गुरुजी



Ads by Guruji

10Paisa.com Smallcaps + Multibaggers


आपला जीवन साथी आपण आपल्या
समाज मधून च शोधून काढा
Exclusive Matrimony Portal for Maharashtrians
marathi matrimony.com
A part of BharatMatrimony.com
Register FREE
Brahmin
Maratha
Kunbi